महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई असा बदल करण्याबाबत नावात बदल करणेबाबत ....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. संघटना १५१९/प्र.क्र.१९९ /१६-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०१९

<u>वाचा:-</u>

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरजीए-१०६९/१८६५/९८-जे,दि.१८.०१.१९६९
२. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे क्र.विराआ/रासआ/आस्था-१-अ/२०१८/ संकीर्ण/ प्र.क्र.१६/ब-१२६, दि.१२.०२.२०१९ रोजीचे पत्र.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संघटना १५१५/प्र.क्र.१३८/१६-अ,दि. २१.७.२०१५.

<u>प्रस्तावना</u>:-

शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेत्तर) संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून मान्यता देण्यात येते. संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई या संघटनेस पूर्वीच्या मुंबई नागरी सेवा वर्तणूक, शिस्त व अपील नियमांतील तरतूदींन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. देशात कर पध्दतीमध्ये बदल होऊन विक्रीकर ऐवजी वस्तू व सेवा कर लागू झालेला आहे. या संकल्पनेवर महाराष्ट्रातील विक्रीकर विभागाचे नाव दि.१.७.२०१७ पासून “वस्तू व सेवा कर विभाग” असे बदलण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.२ अन्वये, वित्त विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुषंगाने, “ महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी संघटना, मुंबई Maharashtra Sales Tax Gazetted officers Association” हया नावामध्ये “महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई Maharashtra States Goods and Services Tax Gazetted officers Association Mumbai” असा बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>**शासन निर्णय:-**</u>

“महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी संघटना, मुंबई Maharashtra Sales Tax Gazetted officers Association” या शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेच्या नावात संदर्भाधीन क्र.३ येथील शासन परिपत्रकामध्ये नमूद कार्यपद्धतीस अनुसरुन “महाराष्ट्र वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई Maharashtra States Goods and Services Tax Gazetted officers Association Mumbai” असा बदल करण्यास शासन या अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी संघटना, मुंबई या संघटनेची मान्यता संदर्भ क्र.१ अन्वये देण्यात आली आहे. उक्त संघटना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अंमलात येण्यापूर्वीची असल्याने सदर नियमान्वये कलम २९ व ३० अन्वये विहीत करण्यात आलेली नवीन आदर्श नियमावली (घटना) उक्त संघटनेने स्विकारलेली नसल्याने सदर घटना स्विकारण्यासाठी घटनादुरुस्तीचा प्रस्ताव विहीत मार्गाने सादर करावा.

३. लेटरहेडवर शासन मान्यतेचा पूर्वीचा क्रमांक नमूद करुन त्याखाली या शासन निर्णयाचाही क्रमांक नमूद करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६१३१६०९२७१५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram
Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.06.13 15:56:27 +05'30'

(टि.वा.करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२.मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३.मा. राज्यमंत्री (साप्रवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५.आयुक्त, विशेष राज्यकर, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर (विक्रीकर) भवन, माझगांव, मुंबई ४०००१०.
६.जिल्हाधिकारी, मुंबई.
७. महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटना मुंबई, - वित्त विभागामार्फत,
८.निवड नस्ती/कार्यासन १६-अ.